
*MARATHI - "No adjustments later"*



**आताच निर्णय घेण्याची आवश्यकता आहे;**

# नंतर तडजोड नाही !

एक होता लाकूडतोड्या. त्याला एक खूप उंच झाड तोडायचे होते. त्याने सरळ कुऱ्हाड घेऊन घाव घालायला सुरुवात केली. शेवटी ते झाड कोसळले. लाकूडतोड्याचे महत्त्वाचे काम आता झाले होते. परंतु क्षणातच तो गंभीर झाला. कारण त्याला आपल्या योजनारहित कामाचा पश्चात्ताप होत होता. हे झाड किती उंच आहे, तोडल्यानंतर ते कुठे पडेल, त्याला किती जागा लागेल हा विचारच लाकूडतोड्याने केला नव्हता. त्याने सरळ कुऱ्हाडीचे घाव घालायला सुरुवात केली होती. आणि मग ते झाड एका अरुंद अशा डोंगराच्या घळईत पडून अडकले. त्यामुळे ते फोडून त्याचे तुकडे करणे अगदी अशक्य होऊन बसले.

झाड उभे असताना लाकूडतोड्याला विचारपूर्वक निर्णय घेता आला असता. पण आता कितीही इच्छा असली तरी आपल्या निर्णयात बदल करणे त्याला शक्य नव्हते.

मित्रांनो, आताच तुम्हांला निर्णय घेण्याची संधी आहे. तुम्ही जर लाकूडतोड्यासारखा निर्णय घेतला नाही तर असा एक दिवस येत आहे की त्या दिवशी तुम्हांला पस्तावा होईल. मग त्या दिवशी तुमची जी परिस्थिती असेल तीत बदल करणे तुम्हांला शक्य होणार नाही. आता जी संधी तुम्हांला आहे ती त्या दिवशी मिळणार नाही.



पुष्कळ लोकांचा असा समज आहे की, मृत्यू म्हणजे आपल्या अस्तित्वाचा शेवट, आपला संपूर्ण नाश. पण असे नाही. मृत्यू म्हणजे शरीरापासून वेगळे होणे. त्यावेळी शरीरापासून वेगळ्या झालेल्या माणसाच्या आत्म्यावर एक तर परमेश्वराचा किंवा सैतानाचा तरी हक्क असतो.

परमेश्वराने आपल्याला सूचना देण्यासाठी बायबल दिले आहे. त्यात मृत्यू हा आपल्या उमेदवारीच्या काळाचा शेवट . . . अंतिम घटना असल्याचे म्हटले आहे. आपल्या शरीरापासून आत्मा वेगळा झाल्यावर कसलीही तडजोड होण्याची शक्यता नाही. " . . .झाड दक्षिणेकडे पडो की उत्तरेकडे पडो, ते पडेल त्याच ठिकाणी राहणार" (उपदेशक ११:३).

तुम्ही एखाद्या सोयीस्कर वेळेसाठी थांबला असाल तर ती वेळ केव्हाही येणार नाही याची खात्री बाळगा, कारण परमेश्वर आपल्याला संधी देण्याच्या वेळेबद्दल केव्हाही चूक करीत नाही. बायबलमध्ये लिहिले आहे, "पाहा, आताच प्रसाद समय आहे; पाहा, आताच तारणाचा दिवस आहे" (२ करिंथ ६:२). "आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकाल, तर . . .तुम्ही आपली मने कठीण करू नका" (इब्री. ३:६, ८).

काही लोक म्हणतात, "आमच्यावर वेळ येईल तेव्हा पाहू !" आता त्यांना त्याबाबत काहीही विचार करण्याची इच्छा नसते. पण तुम्ही ही हस्तपत्रिका वाचली त्यामुळे याबाबतची निकड तुम्हांला समजली. जर त्याबाबत निर्णय

घ्यायला तुम्ही उशीर केलात आणि तुमच्यावर मृत्यूने आपले पाश टाकले तर तुम्ही आपल्या पापातच मराल. सारे समजत असूनही तुम्ही योग्य निर्णय न घेतल्याबद्दल तुम्हांला परमेश्वरासमोर जाब द्यावा लागेल.

वस्तुस्थितीला तोंड देण्यासाठी तुमच्याजवळ पुरेसे धैर्य असेल तर तुम्ही तुमच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न करालच ! तारणाचा (मुक्तीचा) शोध करीत असताना पुढील पाच पायऱ्या तुम्हांला अवश्य मदत करतील.

१. तुम्ही पापी आहात आणि आपले तारण साधण्यासाठी सर्वतोपरी असहाय्य आहात अशी तुमची पूर्ण खात्री पटली पाहिजे. पवित्र शास्त्र (बायबल) सांगते, "सर्वांनी पाप केले आहे, आणि देवाच्या गौरवाला ते अंतरले आहेत" (रोम. ३:२३).

२. पश्चात्ताप करा. म्हणजेच तुम्ही केलेल्या सर्व पापांबद्दल दुःख करून त्यापासून वळा. "तुम्ही पश्चात्ताप न केल्यास सर्व त्याप्रमाणे नाश पावाल" (लूक १३ : ३).

३. तुम्ही पापी असून तुम्हांला तारणाची गरज आहे हे परमेश्वरापुढे कबूल करा. तसेच येशू ख्रिस्तासाठी तुमचा स्वीकार करण्याची त्याला विनंती करा. तो म्हणतो : "जर आपण स्वतःची पापे पदरी घेतो, तर तो विश्वासू व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील व आपल्याला सर्व अधर्मा-



पासून शुद्ध करील" (१ योहान १:९). "...जो मजकडे येतो त्याला मी घालवणार नाहीच" (योहान ६:३७).

४. तुम्हांला अनंत जीवन प्राप्त व्हावे म्हणून तुमच्यासाठी येशू ख्रिस्त मरण पावला यावर विश्वास ठेवा. जर तुम्ही पश्चात्ताप करून परमेश्वराला पूर्णपणे शरण गेला असाल तर विश्वासाद्वारे त्याला आपला प्रभू व तारणदाता म्हणून स्वीकारण्याबाबत तुमच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल आणि त्याच विश्वासामध्ये तुमचे तारण केल्याबद्दल तुम्ही त्याला धन्यवाद द्याल. असे करताना तुमच्या आत्म्याबरोबर त्याचा आत्मा तुमचा नव्याने जन्म होत असल्याची साक्ष देईल.

५. तुमची जात, पंथ विसरा. तुमचा व्यवसाय लपवू नका. परमेश्वराच्या कृपेने तुम्ही आता ख्रिस्ताचे झाला आहात. त्याबद्दल इतरांना सांगा. तुम्हांला छळ सहन करावा लागेल, परंतु "सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाची शांती तुमची अंतःकरणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूमध्ये राखील" (फिलिप्पै. ४:७). तुमच्या साक्षीशी तुम्ही प्रामाणिक राहिलात तर त्याच्यासाठी इतरांना जिंकण्याचा आनंद प्रभू तुम्हांला देईल. येशू म्हणतो, "जो कोणी मनुष्यांसमोर मला स्वीकारील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर स्वीकारीन (मत्तय १० : ३२). तुमची जबाबदारी कबुली देण्याची व विश्वास ठेवण्याची आहे. संत पौलाने म्हटले आहे : "जर तू आपल्या मुखाने येशू प्रभू आहे असे स्वीकारशील, आणि देवाने त्याला मेलेल्यातून उठवले असा आपल्या अंतःकरणात विश्वास

धरशील तर तुला तारणप्राप्ती होईल. नीतिमत्त्वासाठी विश्वास धरणे अंत:करणाने होते, तारणाचा स्वीकार करणे तोंडाने होते" (रोम. १०:९, १०).

तेव्हा मित्रहो, या छोटयाशा लेखामध्ये तुम्हांला मदत करण्यासाठी जे काही सांगायचे ते आम्ही सांगितले आहे, परंतु तुम्ही बायबलमधील वचनांचा शोध घेऊन अनंत जीवनासंबधी अधिक मनन केले तर परमेश्वर निश्चितच तुम्हांला बोध करील.

"एवढया मोठया तारणाची उपेक्षा केल्यास आपण कसे निभावू?" (इब्री. २:३). अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर लिहा :



2



This booklet "The Heart of Man" is available in over 300 languages and dialects spoken throughout the world (Africa, Asia, The Far East, South America, Europe, etc.)

The 10 heart pictures contained in this booklet are also available in the form of large coloured picture charts (86 x 61cm) bound together in a set of 10 pictures. These "Heart Charts" can be obtained with European or African features and are particularly suitable to be used in conjunction with the Heart Book for class-teaching, open air evangelization etc. Kindly contact us to ascertain the latest subsidized price of this chart.

**********

Kindly write to us if you are able to assist us with further translations of our free Gospel literature, informing us of the language into which you could translate this Gospel literature. Your assistance would be appreciated.

If you have found salvation in Christ, or have been otherwise blessed through our Gospel literature, please let us know. We would like to thank God with you, and remember you further in our prayers.

**********

**Our Heart of Man Book can now be downloaded in 480 different languages onto cell phones, tablets, etc from our website www.angp-hb.co.za.**
. For **free** Gospel literature, books and tracts in over 540 languages, write to:

**E-MAIL: info@angp.co.za**
**ALL NATIONS GOSPEL PUBLISHERS**
**P.O. Box 2191, PRETORIA, 0001, R.S.A.**
(A Gospel Literature Mission financed by donations)
(Reg. No. 1961/001798/08)